| MHKO030087132025 | **<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्रं.७९०८/२०२५</u>**<br>**(महाराष्ट्र सरकार वि. शशिकांत शिवाजीराव घोडके+१ )**<br>**<u>न्या य नि र्ण य</u>**<br>( घोषित दिनांक १० मार्च, २०२६) |
|---|---|

सदर आरोपी क्रं.१ शशिकांत शिवाजीराव घोडके आरोपी क्रं.२ अमित विलास गुरव यांचेविरुध्द गु.र.नं.०८/२०२५ अन्वये मुंबई जुगारबंदी कायदा कलम १२(अ) अंतर्गत लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होवून दोषारोपपत्र दाखल केले.

**२.** फिर्यादी सुरेश शंकर पाटील, पो.कॉ.१३६०, स्थानिक गुन्हा अन्वेषण, कोल्हापूर यांनी आरोपीविरुध्द अशी फिर्याद दिली की, दि.१३/०१/२०२५ रोजी १६.४५ वा. सुमारास कुंभारगल्ली भंडगी बोळाजवळ उघडयावर आरोपी क्रं.१ हा स्वतःचे व मटका बुकी मालक आरोपी क्रं.२ यांचे फायद्याकरिता विनापरावाना, बेकायदा, लोकांकडून पैसे घेवून, आकड्याच्या चिठ्ठया देवून, कल्याण मटका जुगाराचा खेळ खेळत असताना मिळून आला. त्यामुळे आरोपींविरुध्द मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२-अ अन्वये **<u>नि.७</u>** कडे निवेदन नोंदविणेत आले. आरोपींनी गुन्हा अमान्य करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची समर्थता दर्शविली.

**३.** सरकार पक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील मुद्दे विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| <u>अ.क्रं.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दि.१३/०१/२०२५ रोजी १६.४५ वा. सुमारास कुंभारगल्ली भंडगी बोळाजवळ उघडयावर आरोपी क्रं.१ व २ हे कल्याण मटका नावाचा जुगाराचा खेळ खेळत होते व मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२-अ अन्वये त्यांनी गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| **२.** | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष सोडण्यात येते.** |

**४.** सदर प्रकरणी अभियोग पक्षाने केवळ पंच साक्षीदार श्री नेमिनाथ रामचंद्र कापसे (सा.क्रं.१) यांना तपासले आहे. यातील फिर्यादी व अन्य साक्षीदारांना वेळोवेळी साक्षीसमन्स पाठवूनही व सदरचे साक्षी समन्स साक्षीदारांना मिळूनही ते न्यायालयासमोर हजर झाले नाहीत. तद्नंतर नि.०१ कडे आदेश करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करणेत आला. आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर येवू न

शकलेने आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे निवेदने नोंदविणेत आले नाही. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपींतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

## *का र ण मि मां सा*

### मुद्दा क्रं.१ करीता

५. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या एकमेव साक्षीदाराचे म्हणजेच या प्रकरणातील पंच साक्षीदार श्री नेमिनाथ रामचंद्र कापसे (सा.क्रं.१) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता दि.१३/०१/२०२५ रोजी त्यांना स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखा, कोल्हापूर यांनी त्यांना पोलीस ठाणेत बोलवले असल्याचे कथन करुन, ते पोलीसांसोबत कोठेही पंचनामेस गेले नसल्याचे व त्यांचे समक्ष काहीही जप्त केले नसल्याचे कथन करुन, पंचनामेवरील अ.क्रं.२ वरील सही **(नि.१२)** ओळखून पंचनामेतील मजकूर नाकारला आहे. प्रस्तुत साक्षीदार हा अभियोग पक्षाच्या कथनांना पुष्टी देत नसल्याने सरकारी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उलटतपासीरुपी प्रश्न विचारण्याची संधी देणेत आली. परंतु, सदरचा पंचनामा शाबीत करणेस अभियोग पक्ष असफल ठरला आहे व सदर पंच साक्षीदाराने कथीत छापा त्याच्या समक्ष पडल्याचे, त्याचे समोर घटनास्थळी आरोपी जुगार खेळताना मिळून आल्याचे, साहित्य मिळाल्याचे नाकारल्याने घटनेबाबत संशय निर्माण होतो.

६. सरकारपक्षाने आरोपींविरुध्द केस शाबीत करणेसाठी आरोपी क्रं.१ हा वर नमूद ठिकाणी स्वतःचे तसेच मटका बुकी मालक आरोपी क्रं.२ याचे फायदेकरिता कल्याण मटका जुगार खेळत होता ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे, परंतु ते शाबीत करण्यास सरकार पक्ष याकामी असफल ठरला आहे. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांनी याकामी पंच साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार, फिर्यादी, तपासी अधिकारी व इतर महत्वाचे साक्षीदारांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे फिर्याद न्यायालयासमोर सिध्द झाली नाही. सरकारी पक्षाचे महत्वाचे साक्षीदार वेळोवेळी संधी देवूनही न्यायालयासमोर हजर झाले नाहीत. पंच साक्षीदारांनी पंचनामा नाकारल्यामुळे घटनेबाबत संशय निर्माण होतो. तसेच, सदरची घटना सिध्द करणेकामी जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयासक्षम दाखल केला नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल आरोपींच्याच ताब्यातून जप्त केलेला आहे किंवा कसे ही बाबच मुळात शाबीत झालेली नाही. फिर्याद सिध्द झाली नाही. म्हणून आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप फिर्यादव्दारे सिध्द झाला नाही. या सर्व कारणास्तव सरकारपक्ष आरोपींविरुध्द गुन्हा निःसंशयपणे शाबीत करणेस अयशस्वी ठरलेने आरोपींना संशयाचा फायदा देवून सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करणे योग्य वाटते. प्रस्तुत कामी अपील कालावधीनंतर जप्त मुद्देमाल अ)रोख रक्कम रु.२४१०/- ही सरकारी खात्यात जमा करणे ब)एक बॉल पेन व मटक्याच्या आकडे लिहलेल्या चिठ्ठया हे मुल्यहीन असलेने नियमाप्रमाणे नष्ट करणे न्यायोचीत वाटते. सबब, मुद्दा कं.१ चे उत्तर **'नकारार्थी'** नोंदवून मुद्दा क्रं.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

| आ दे श | |
|---|---|
| **१.** | आरोपी क्रं.१ **शशिकांत शिवाजीराव घोडके** व आरोपी क्रं.२ **अमित विलास गुरव** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२-अ या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **२.** | जप्त मुद्देमालापैकी रोख रक्कम रु.२,४१०/- ही अपील कालावधीनंतर सरकारी खात्यात जमा करणेत यावी. |
| **३.** | मुल्यहीन जप्त मुद्देमाल आकडे लिहलेले चिठ्ठी व बॉलपेन याची अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे निर्गती करणेत यावी. |
| **४.** | आरोपींनी दिलेले वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र हे रद्द करण्यात येत आहेत. |
| **५.** | आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता प्रत्येकी रक्कम रूपये ७,५००/- चे वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.03.10 17:14:07 +0530

दिनांक १०/०३/२०२६
**कोल्हापूर**

**(श्रीमती पंकज बी. राजपूत)**
प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रं.११, कोल्हापूर.